(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात

नागपूर खंडपीठ, नागपूर.

रिट याचिका क्र. १८३८/२०१८

राजेंद्र वल्द द्वारकानाथ बाकरे ,

वय ५० वर्ष, व्यवसाय: काही नाही,

राहणार - समर्थ अपार्टमेंट, ४८ रामकृष्ण नगर,

खामला, नागपूर - ४४००२५ . ..........याचिकाकर्ता

....विरुद्ध....

१) सहाय्यक कामगार आयुक्त (मध्यवर्ती), नागपूर

प्रथम मजला, ब्लॉक सी. सी. जी. ओ. कॉम्प्लेक्स,

सेमिनरी हिल्स, नागपूर-४४०००६ .

२) बँक ऑफ इंडिया, मार्फत सहाय्यक महाव्यवस्थापक,

नागपूर, विभागीय कार्यालय विदर्भ झोन, बँक ऑफ इंडिया,

एस. व्ही. पटेल रोड, नागपूर-४४०००१ ..........उत्तरवादी

याचिकाकर्ता स्वतः

उत्तरवादी क्र. २ करीता वकील - श्री ए. टी. पुरोहित.

न्यायमंच : न्यायमूर्ति ए. एस. चांदुरकर आणि न्यायमूर्ति श्रीमती वृषाली व्ही. जोशी.

दिनांक : जानेवारी ३०, २०२३

मौखिक न्यायनिर्णय ( न्या. ए. एस. चांदुरकर द्वारा,)

अधिनिर्णय - अधिनिर्णय जारी करून त्यावर उत्तर तत्काळ मागविण्यात आले. याचिकाकर्त्यास व्यक्तिशः आणि उत्तरवादी क्रमांक २ चे विद्वान वकील ए. टी. पुरोहित यांना ऐकले.

याचिकाकर्त्याने दिनांक ०१/१०/२०१५ रोजी उत्तरवादी क्र. २ बँक ऑफ इंडिया यांनी औद्योगिक विवाद कायदा १९४७ च्या ( संक्षिप्त मधे '१९४७ चा कायदा') कलम

३३ (१) (बी) चे उल्लंघन केल्याबद्दल पारित केलेला बडतर्फी चा आदेश सुरुवातीपासून रद्दबातल करण्याची आणि याचिकाकर्त्याची सेवा अखंडित करण्याच्या घोषणेची मागणी केली आहे.

२. प्रस्तुत कार्यवाहीला कारणीभूत वस्तुस्थिती अशी आहे की दिनांक २०/०१/१९८४ रोजी याचिकाकर्त्याची बँकेच्या लिपिक संवर्गात नियुक्ती झाली होती. परंतु, दिनांक १२/०२/१९९१ च्या आदेशानुसार त्याची सेवा समाप्त करण्यात आली. या आदेशामुळे व्यथित झाल्याने, याचिकाकर्त्याने केंद्र सरकारच्या औद्योगिक न्यायाधिकरणा समक्ष सेवा समाप्तीच्या आदेशाला आव्हान देऊन कार्यवाही सुरु केली. दिनांक ७/११/२०१२ रोजी दिलेल्या निकालानुसार न्यायाधिकरणाने बडतर्फीचा आदेश रद्द घोषित केला आणि सदर आदेश बेकायदेशीर ठरवल्यानंतर सेवेतील सातत्य राखून सर्व परिणामी लाभांसह याचिकाकर्त्याला पुनर्स्थापित करण्याचे आदेश दिले. दिनांक २/१२/२०१३ रोजी याचिकाकर्त्यांची सेवा पुनर्स्थापित करण्यात आली. याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, बँकेचा याचिकाकर्त्याला त्रास देण्याचा हेतू होता आणि अशा प्रकारे त्याच्या गैरहजेरीचा खोटा रेकॉर्ड तयार केला आणि त्याची अनधिकृत अनुपस्थिति मानण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे याचिकाकर्त्याने सहाय्यक कामगार आयुक्तांकडे तक्रार केली. त्यानुसार दिनांक १०/१२/२०१४ रोजी सहाय्यक कामगार आयुक्तांनी या संदर्भात समेट प्रक्रिया सुरू केली. सदर कार्यवाही प्रलंबित असताना बँकेने दिनांक ०१/१०/२०१५ रोजी शिक्षेचा आदेश जारी केला आणि गैरवर्तणुकीसाठी याचिकाकर्त्याला सेवेतून बडतर्फ केले. बेकायदेशीरपणे अनुपस्थित राहणे, शिरजोरपणा आणि बँकेविरोधात खोट्या तक्रारी करणे हे आरोप लावले होते. त्याच दिवशी याचिकाकर्त्याने सहाय्यक कामगार आयुक्तांकडे धाव घेतली आणि १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३-अ अंतर्गत प्रलंबित असलेल्या तक्रारीत एक पूरकपत्र सादर केले. परंतु, दिनांक २६/१०/२०१५ रोजी सहाय्यक कामगार आयुक्तांनी अभिवेदन नोंदणीकृत कामगार संघटने मार्फत दाखल न केल्यामुळे १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३-अ चे उल्लंघन झाले या कारणावरून याचिकाकर्त्याच्या

तक्रारीची दखल घेण्यास नकार दिला. उपरोक्त उत्तराने व्यथित झाल्याने याचिकाकर्त्याने त्यास आव्हान देण्याकरिता रीट याचिका क्रमांक ६९५/२०१६ दाखल केली. दिनांक २४/०३/२०१७ रोजीच्या आदेशात माननीय न्यायालयाने असे नमूद केले आहे कि सहाय्यक कामगार आयुक्त यांनी दिनांक २/१०/१५ रोजी केलेला पत्रव्यवहार अमान्य आहे आणि तो १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३-अ च्या तरतुदींकडे दुर्लक्ष करून जारी करण्यात आला होता. याचिकाकर्त्याचे अभिवेदन प्रत्यस्थापीत करण्यात आले आणि संबंधित कार्यवाही निष्पक्ष पद्धतीने विचार करण्यासाठी इतर समान दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्याचे निर्देश जारी करण्यात आले. सहाय्यक कामगार आयुक्तांवर तीन हजार रुपयांचा खर्च लादून सदर याचिका मंजूर करण्यात आली. त्यानंतर सदर कार्यवाही सहाय्यक कामगार आयुक्त, चंद्रपूर या कार्यालयातून सहाय्यक कामगार आयुक्त, नागपूर येथील कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आली. दिनांक ०३/११/२०१७ रोजी सहाय्यक कामगार आयुक्तांनी 'समेट प्रक्रिया निष्फळ' नोंदवून समेट प्रक्रिया निष्फळ अहवाल समुचित सरकारकडे पाठवला. दिनांक २३/११/२०१७ रोजी समुचित सरकारला निष्फळ अहवाल प्राप्त झाला. त्यानंतर याचिकाकर्त्याने त्याबाबत तक्रार उपस्थित करून रिट याचिका क्रमांक ६९५/२०१६ मध्ये दिवाणी अर्ज (डब्ल्यू) क्रमांक २६२९/२०१७ दाखल केला. त्यामधे या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की अशी तक्रार नव्याने दाखल करणे आवश्यक आहे आणि त्यामुळे दिवाणी अर्ज स्वीकारला नाही. या पार्श्वभूमीवर दिनांक २७/२/२०१८ रोजी प्रस्तुत याचिका दाखल करण्यात आली असून त्यात ०१/१०/२०१५ रोजी समेट प्रक्रिया प्रलंबित असतांना बडतर्फीचा जारी करण्यात आलेला आदेश रद्दबातल करण्यात यावा  याचिकाकर्त्याला आवश्यक दिलासा मिळवा, अशी मागणी करण्यात आली आहे.

३. याचिकाकर्त्याने स्वतः जातीने अभिलेखावरील वस्तुस्थितीचा उल्लेख केला आणि सांगितले की चंद्रपूर येथील सहाय्यक कामगार आयुक्तांनी दिनांक १०/१२/२०१४ रोजी समेट प्रक्रिया सुरू केली होती. दिनांक ०१/१०/२०१५ रोजी

बडतर्फीचा आदेश काढण्यात आला होता त्यावेळी समेट प्रक्रिया प्रलंबित होती हि वस्तुस्थिती मान्य करण्यात आली. दिनांक १०/१२/२०१४ रोजी समेट प्रक्रिया सुरु करण्यात आली होती हि वस्तुस्थिती बँकेने त्यांनी दिलेल्या उत्तरातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये मान्य केली आहे. बँकेने बडतर्फी चा आदेश जारी केल्यानंतर त्याच दिवशी याचिकाकर्त्याने सहाय्यक कामगार आयुक्तांकडे १९४७ च्या कायद्याच्या कलाम ३३-अ च्या तरतुदीचे उल्लंघन केल्याची तक्रार केली होती. न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ६९५/२०१६ चा निर्णय देताना स्पष्टपने नमूद केले आहे कि सहाय्यक कामगार आयुक्त दिनांक २६/१०/२०१५ रोजी सदर तक्रार निकाली काढताना १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३-अ ची तरतूद विचारात घेण्यात अपयशी ठरले आहे. परिणामतः प्रलंबित असलेली समेट प्रक्रिया सहाय्यक कामगार आयुक्त, नागपूर कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आली आणि सदर प्रक्रियेचा निष्फळ अहवाल दिनांक ०३/११/२०१७ रोजी आला.  पुढे असे नमूद करण्यात आले आहे कि, १९४७ च्या कायद्यातील कलम २०(२)(ब) च्या तरतुदींच्या आधारे समुचित सरकारला निष्फळ अहवाल प्राप्त होण्याच्या दिनांकापर्यंत समेट प्रक्रिया पूर्ण झाली नाही असे मानण्यात आले. समुचित सरकारने माहितीचा अधिकार कायदा २००५ च्या तरतुदीच्या आधारे दिनांक ०५/०२/२०१८ रोजी सादर केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून आले कि याचिकाकर्त्याने स्वतः सादर केले आहे कि दिनांक २३/११/२०१७ रोजी समुचित सरकारला 'समेट निष्फळ अहवाल' प्राप्त झाला होता. त्यावरून असे स्पष्ट होते कि दिनांक १०/१२/२०१४ रोजी सुरु झालेली समेट प्रक्रिया हि बडतर्फ आदेश जारी केल्याचा दिनांक ०१/१०/२०१५ पर्यंत प्रलंबित होती. याचिकाकर्त्याच्या सेवेच्या अटी बदलण्यापूर्वी बँकेने सहाय्यक कामगार आयुक्तांची परवानगी मागितली नव्हती. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३ (१) च्या तरतुदीचे पालन न करता, दिनांक ०१/१०/२०१५ रोजीच बडतर्फीचा आदेश पारित करण्यात आला. परिणामतः त्याचा परिणाम त्या अनुसार होईल आणि म्हणूच दिनांक ०१/१०/२०१५ चा पारित केलेला बडतर्फीचा आदेश रद्दबातल करण्यात यावा.

यासंदर्भात याचिकाकर्त्याने स्वतः घटनापीठाने पारित केलेले जयपूर जिला सहकारी भूमी विकास लिमिटेड - विरुद्ध - रामगोपाल शर्मा आणि इतर **[(२००२)२ एस.सी.सी. २४४],** मेसर्स लोकमत न्युज पेपर प्रायव्हेट लिमिटेड- विरुद्ध- शंकरप्रसाद **[ए आय आर १९९९ एस. सी. २४२३]** आणि बजाज ऑटो लिमिटेड - विरुद्ध - राजेंद्र कुमार जगन्नाथ कथार आणि इतर **[(२०१३) ६ एस सी आर ३०१]** आणि भिलवाडा दुग्ध उत्पादक सहकारी संस्था लिमिटेड - विरुद्ध - विनोद कूमार शर्मा मृत त्याच्या वारसां मार्फत आणि इतर **[(२०११) १० एस सी आर ८१९]** या न्यायनिर्णयांचा आधार घेतला व असे प्रतिपादन करण्यात आले कि रिट याचिकेत मागितलेला दिलासा मिळण्याचा याचिकाकर्त्याला हक्क आहे.

४ ) बँकेचे विद्वान वकील ए. टी. पुरोहित यांनी या निवेदनाला विरोध केला. त्यांच्या मते, याचिकाकर्त्याने सुरुवातीला वेतन न दिल्याबद्दल दिनांक २२/०९/२०१४ रोजी अभिवेदन दाखल केले होते. त्या तक्रारीची दखल घेण्यात आली होती आणि सहाय्यक कामगार आयुक्तांनी कार्यवाही सुरू केली होती. सहाय्यक कामगार आयुक्तांनी बँकेच्या उत्तराचा विचार केला आणि त्यानंतर असे निरीक्षण नोंदवले की याचिकाकर्ता अनुशासन प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध नोंदणीकृत कामगार संघटनेच्या माध्यमातून वाद उपस्थित करू शकतो. दिनांक २३/०९/२०१५ रोजी त्या कारणावरून सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांनी कार्यवाही समाप्त करून प्रकरण बंद केले. म्हणूनच दिनांक ०१/१०/२०१५ रोजीचा बडतर्फीचा आदेश असल्यामुळे याचिकाकर्त्याला नवी तक्रार दाखल करणे आवश्यक होते. परंतु असे करण्याऐवजी याचिकाकर्त्याने १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३-अ अंतर्गत एक परिशिष्ट दाखल केले जे सहाय्यक कामगार आयुक्तांनी २६/१०/२०१५ रोजी चालवाण्यास अयोग्य ठरवले. त्या पार्श्वभूमीवर या आदेशाला रिट याचिका क्र. ६९५/२०१६ मध्ये आव्हान देण्यात आले होते. दिनांक २३/०९/२०१५ चा आदेश असतांनाही याचिकाकर्ता दिनांक ०१/१०/२०१५ च्या बडतर्फीच्या आदेशास आव्हान देण्याकरिता नव्याने तक्रार दाखल करण्यास अपयशी ठरला. या कारणामुळे १९४७ च्या कायद्यातील कलम ३३-अ चे उल्लंघन झाले असे

म्हणता येणार नाही कारण वस्तुस्थिती पाहता दिनांक २३/०९/२०१५ रोजी समेट प्रक्रिया बंद करण्यात आली होती. याचिकाकर्त्याला सहाय्यक कामगार आयुक्तांच्या कार्यालयाकडून तसे पत्र प्राप्त झाले होते आणि म्हणूनच १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३-(१) चे उल्लंघन करून बरखास्तीचा आदेश रद्दबातल करण्यात यावा अश्या याचिकाकर्त्याने घेतलेल्या भूमिकेमध्ये कोणतेही तथ्य नव्हते. त्यामुळे ही याचिका फेटाळली जावी, अशी विनंती करण्यात आली होती.

५) आम्ही विरोधी पक्षांचे म्हणणे ऐकले आणि अभिलेखावर दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. विनंती केल्याप्रमाणे त्यांच्या म्हणण्यावर योग्य विचार केल्यानंतर खालील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

अ) दिनांक १०/१२/२०१४ रोजी सुरु करण्यात आलेली समेट प्रक्रिया सहाय्यक कामगार आयुक्तांनी सांगितल्या प्रमाणे दिनांक २३/०९/२०१५ रोजी संपुष्टात आली का? किंवा दिनांक २३/११/२०१७ रोजी जेव्हा समुचित सरकारला 'समेट निष्फळ अहवाल' प्राप्त झाला तेव्हाच पूर्ण झाली असे मानणे आवश्यक आहे.

ब) दिनांक ०१/१०/२०१५ रोजी जेव्हा बडतर्फ आदेश बँकेकडून जारी करण्यात आला होता तेव्हा समेट प्रक्रिया प्रलंबित होती का ?

क) दिनांक ०१/१०/२०१५ च्या बडतर्फीच्या आदेशाने १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३(१)(ब) चे उल्लंघन केल्याचे आढळते का ? असे असल्यास त्याचा काय परिणाम होतो ?

६) <u>**मुद्दा क्रमांक (अ) नुसार :-**</u> अभिलेखावरील वस्तुस्थीवरून असे सूचित होते कि याचिकाकर्त्याने सुरवातीला दिनांक २२/०९/२०१४ रोजी वेतन न देता अनुचित कामगार श्रम प्रथा या विषयी याचिका दाखल केली होती. याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, त्याच्या अनुपस्थितीला अनधिकृत मानून त्याला त्याचे वेतन दिले जात नव्हते. याचिकाकर्त्याच्या अभिवेदनावर कार्यवाहि करताना सहाय्यक कामगार आयुक्तांनी दिनांक १४/१०/२०१४ रोजी दोन्ही पक्षांना नोटीस जारी केली होती. बँकेने आपले उत्तर सादर केले आणि अशी भूमिका घेतली की दिनांक ०७/११/२०१२ रोजी

केंद्र सरकारच्या औद्योगिक न्यायधिकरणाने मंजूर केलेल्या आदेशानुसार दिनांक ०२/०२/२०१३ रोजी त्याला पुनर्रनियुक्त करण्यात आले असूनही याचिकाकर्ता नियमितपणे कामावर हजर होत नव्हता. त्यामुळे कथित गैरवर्तणुकीबद्दल शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात आली आणि संबंधित कार्यवाही प्रलंबित होती. या आधारावर दिनांक २३/०९/२०१५ रोजी सहाय्यक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांनी त्या दिवशी कामकाज समपुष्टात आल्याचे सांगितले. असे निदर्शनास आले की शिस्तपालन प्राधिकारीच्या आदेशाविरुद्ध नोंदणीकृत कामगार संघटनेच्या माध्यमातून याचिकाकर्ता वाद उपस्थित करू शकत होता. दिनांक ०१/१०/२०१५ रोजी बँकेने त्याने गैरवर्तन केल्याबद्दल सुरु केलेल्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या आधारे शिक्षेचा आदेश दिला. त्याच दिवशी याचिकाकर्त्याने सहाय्यक कामगार आयुक्तांकडे तक्रार केली की समेट प्रक्रिया प्रलंबित असताना त्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. हे १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३ - अ चे उल्लंघन आहे. सहाय्यक कामगार आयुक्त यांनी हे अभिवेदन बँकेच्या अधिकृत कामगार संघटनेच्या माध्यमातून दाखल करणे आवश्यक असल्यामुळे विचारात घेतले नाही. यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे, रिट याचिका क्र. ६९५/२०१६ मध्ये या न्यायालयाने आदेश रद्दबातल ठरवून आणि याचिकाकर्त्याचे अभिवेदन/अर्ज पूर्ववत करण्यात आला आणि कार्यवाही सामान दर्जाच्या अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्याचे आदेश देण्यात आले. या आदेशानुसार ही कार्यवाही सहाय्यक कामगार आयुक्त, नागपूर ७. यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आली.

७. दिनांक २३/०९/२०१५ रोजी सहाय्यक कामगार आयुक्तांनी समेट प्रक्रिया पूर्ण झाली आणि त्यामुळे ती संपुष्टात आली असे नोंदविलेले निरीक्षण पाहता त्याचा कायदेशीर परिणाम काय होतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे. १९४७ च्या कायद्याच्या कलम २०(२)(ब) च्या तरतुदींनुसार कार्यवाही पूर्ण करण्याचा सहाय्यक कामगार आयुक्तांच्या वरील आदेशाची माहिती समुचित सरकारला देण्यात आली असे बँकेने दर्शविले नाही. उपरोक्त तरतुदी नुसार जेव्हा समेट प्रक्रियेत तोडगा निघत नाही तेव्हा

समेट अधिकाऱ्याचा अहवाल योग्य सरकारला प्राप्त झाल्यावर किंवा १९४७ च्या कायद्याच्या कलम १७ अन्वये मंडळाचा अहवाल प्रकाशित झाल्यावरच तो संपुष्टात आला असे मानले जाईल. या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाचे दिलेले न्यायनिर्णय अंधेरी मरोळ कुर्ला बस सेवा आणि इतर -विरुद्ध - द स्टेट ऑफ बॉम्बे **[ए आय आर १९५९ एस सी ८४१]** ज्या मध्ये समेट प्रक्रिया केव्हा संपुष्टात येऊ शकते हा प्रश्न विचारात घेण्यात आला आहे. १९४७ च्या कायद्याच्या कलम १२ अन्वये समेट प्रक्रिया सुरु झाल्यापासून चौदा दिवसाच्या आत आपला अहवाल सादर करणे हे समेट अधिकाऱ्याचे कर्तव्य असले तरी सदर कार्यवाही चौदा दिवसांच्या आत संपत नाही, परंतू कलम २०(२)(ब) मधील तरतुदीच्या अनुषंगाने समेट घडत नसेल तर समेट अधिकाऱ्याचा अहवाल समुचित सरकारला प्राप्त झाला तरच अशी कार्यवाही संपुष्टात येते असे मत व्यक्त करण्यात आले आहे. दिनांक २३/०९/२०१५ चा समेट अहवाल समुचित सरकारकडे कलम २२(२)(बी) च्या तरतुदीनुसार पाठविण्यात आला असल्याचे दर्शविले नसल्यामुळे सदर समेट प्रक्रिया पूर्ण झाली नाही आणि 'समेट निष्फळ अहवाल' समुचित सरकारला प्राप्त होईपर्यंत ती प्रक्रिया प्रलंबित होती असे म्हणावे लागेल. हि वस्तुस्थिती मान्य आहे कि, दिनांक १०/१२/२०१४ रोजी समेट प्रक्रिया सुरु करण्यात आली होती आणि दिनांक २४/०३/२०१७ रोजी रीट याचिका क्रमांक ६९५/२०१६ मध्ये पारित झालेल्या आदेशानुसार सदर कार्यवाही साहाय्य कामगार आयुक्त, नागपूर यांच्या कडे वर्ग करण्यात आली होती.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने मेसर्स लोकमत न्यूजपेपर्स प्रायव्हेट लिमिटेड (उपरोल्लेखित) मध्ये स्पष्ट शब्दात सांगितले आहे की जोपर्यंत 'समेट निष्फळ अहवाल' समुचित सरकारपर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंत समेट प्रक्रिया समाप्त झाल्याचे म्हणता येणार नाही. कलम ३३(१) चे उल्लंघन केल्यास ते १९४७ च्या कायद्याच्या कलम ३१ (१) अंतर्गत दंडात्मक कार्यवाहीस पात्र मानले जाईल. दिनांक ०३/११/२०१७ रोजी सहाय्यक कामगार आयुक्त, नागपूर यांनी समुचित सरकारला पाठविलेला 'निष्फळ अहवाल' दिनांक २३/११/२०१७ रोजी प्राप्त झाला यात काही

वाद नाही. १०/१२/२०१४ रोजी सुरु झालेली समेट प्रक्रिया दिनांक २३/११/२०१७ रोजी जेव्हा समुचित सरकारला 'निष्फळ अहवाल' प्राप्त झाला तेव्हाच १९४७ च्या कायद्याच्या कलम २०(२)(ब) नुसार समाप्त झाली असे म्हणता येईल.

**<u>८) मुद्दा क्रमांक (ब) नुसार :-</u>** दिनांक १०/१२/२०१४ रोजी सुरु करण्यात आलेली समेट प्रक्रिया दिनांक २३/११/२०१७ रोजी पूर्ण झाली असे निदर्शनात आल्यामुळे दिनांक ०१/१०/२०१५ रोजी जारी करण्यात आलेला शिक्षेचा आदेश हा समेट प्रक्रियेच्या प्रलंबित कालावधीत जारी करण्यात आला आहे. या संदर्भात हि बाब लक्षात घेतली पाहिजे की, याचिकाकर्त्याने दिनांक २२/०९/२०१४ रोजी समेट अधिकाऱ्याकडे तक्रार केली होती की त्याला कर्तव्यापासून गैरहजर मानले जात आहे त्यामुळे त्याला वेतन दिले जात नाही. सदर तक्रारीची दखल घेत दिनांक १०/१२/२०१४ रोजी समेट प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. बँकेने याचिकाकर्त्यांच्या विरोधात विविध आरोपांखाली शिस्तभंगाची कार्यवाही सुरू केली ज्यात त्याच्या सवयीसवायी प्रमाणे अधूनमधून अनधिकृत अनुपस्थिती दिनांक २८/०१/२०१४ पासून २४/१२/२०१४ पर्यंत चा समावेश आहे. त्याशिवाय शिरजोरी करणे, खोटी तक्रार दाखल करणे आणि चंद्रपूरचा स्थानिक पत्ता न सांगणे हे गुन्हे दाखल करण्यात आले होते. या कार्यवाहीमध्ये दिनांक ०९/०१/२०१५ रोजी चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आणि त्यानंतर सदर चौकशी अधिकाऱ्याने दिनांक १६/०४/२०१५ रोजी आरोप सिद्ध झाल्याचा आपला अहवाल सादर केला. दिनांक २३/०५/२०१५ रोजी याचिकाकर्त्याचे म्हणणे मागवल्यानंतर शिस्तपालन प्राधिकाऱ्याने दिनांक ०१/१०/२०१५ रोजी त्याला बडतर्फीची शिक्षा सुनावली. याचिकाकर्त्यांवर लावण्यात आलेले आरोप, ज्यात अनधिकृत गैरहजेरीचा आरोप समाविष्ट होता, याचा विचार करून असे म्हटले जाऊ शकते की याचिकाकर्त्याने दिनांक २२/०९/२०१४ रोजीच्या त्याच्या प्रारंभिक अभिवेदनाद्वारे उपस्थित केलेल्या वादाशी संबंधित कथित गैरवर्तणुकीची चौकशी करण्यात आली होती. वर नमूद केल्याप्रमाणे, ही सुरुवातीची तक्रार त्यांना अनुपस्थित दाखवण्याच्या संदर्भात होती, ज्यामुळे अनुचित कामगार प्रथा निर्माण झाली.

१९४७ च्या कायद्याच्या कलम ३३(१)(बी) अन्वये नियोक्ता केवळ समेट अधिकाऱ्याच्या लेखी परवानगीने एखाद्या कामगाराला वादाशी संबंधित गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा करू शकतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, जर नियोक्त्याला समेट प्रक्रियेच्या प्रलंबित कालावधीत सेवेच्या अटींमध्ये बदल करायचा असेल किंवा त्या प्रकरणाशी संबंधित कोणत्याही गैरवर्तणुकीसाठी त्याला शिक्षा द्यायची असेल तर ती लेखी स्वरूपात समेट अधिकाऱ्याची परवानगी घेतल्यानंतरच केली जाऊ शकते. दिनांक ०१/१०/२०१५ रोजी बरखास्तीचा आदेश जारी करण्यापूर्वी बँकेने समेट अधिकाऱ्याकडून तत्सम परवानगी घेतली होती, असे हे प्रकरण नाही. उलट, बँकेची अशी भूमिका आहे की, दिनांक ०१/१०/२०१५ च्या बरखास्तीच्या आदेशामुळे नव्याने वाद निर्माण झाला आणि सहाय्यक कामगार आयुक्त, चंद्रपूर यांनी २३/०९/२०१५ रोजी कार्यवाही पूर्ण केल्यामुळे त्यांना समेट अधिकाऱ्याची अशी कोणतीही परवानगी घेणे आवश्यक नव्हते. यावरून हे स्पष्ट होते की समेटाचे प्रकरण ज्यांच्या समक्ष प्रलंबित होते अश्या समेट अधिकाऱ्याच्या लेखी परवानगी अभावी दिनांक ०१/१०/२०१५ रोजी जारी करण्यात आलेला बडतर्फीचा आदेश १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३(१)(ब) च्या तरतुदीचे उल्लंघन करणारा आहे. याचिकाकर्त्याने स्वतः घटनापीठाने दिलेल्या जयपूर जिला सहकारी भुमी विकास बँक लिमिटेड (उपरोल्लेखित) न्यायनिर्णयावर विश्वास ठेऊन त्याचे समर्थन केले आहे ज्यामध्ये असे म्हटले आहे की जरी कलम ३३(२)(ब) चा वापर करून बडतर्फीचा आदेश पारित झालेला असला तरी बडतर्फीच्या तारखेपासून नियोक्ता आणि कर्मचारी यांचे संबंध संपुष्टात आले असले तरी सदर आदेश अपूर्ण आणि अर्धवट राहिल्या कारणाने उपरोक्त तरतुदीनुसार तो प्राधिकरणाच्या मंजुरीच्या अधीन आहे. परंतु मंजुरी दिली नाही तर कर्मचाऱ्याने आणखी काही करण्याची आवश्यकता नाही कारण कार्यमुक्त किंवा बडतर्फीचा आदेश कधीच पारित झालेला नव्हता असे समजावे लागेल. कलम ३३ (२) (ब) अंतर्गत असा अर्ज न केल्यामुळे होणाऱ्या परिणामांचाही उल्लेख करण्यात आला आहे. यावरून हे स्पष्ट होते की बँकेने दंडात्मक आदेश जारी करण्यापूर्वी समेट

अधिकाऱ्याची परवानगी घेण्यात अपयशी ठरल्यामुळे १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३ (१) (ब) तरतुदीचे चे उल्लंघन झाले आहे.

९) मुद्दा क्रमांक (ग) नुसार :- यावरून हे स्पष्ट होते की ज्या समेट अधिकारी ज्यांच्या समक्ष समेट कार्यवाही प्रलंबित होती त्यांच्या परवानगी शिवाय सदर बडतर्फीचा आदेश दिनांक ०१/१०/२०१५ रोजी पारित करण्यात आला होता. सदर आदेशामुळे १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३(१)(ब) या तरतुदीचे उल्लंघन होत आहे. सदर आदेश जयपूर जिला सहकारी भुमी विकास बँक लिमिटेड (उपरोल्लेखित) मध्ये अवैध किंवा रद्दबातल ठरवण्यात आला आहे. पुढे असे स्पष्ट करण्यात आले आहे की, कर्मचाऱ्याची सेवा सुरु ठेवली आहे असे मानले जाईल ज्यामुळे त्याला सर्व उपलब्ध लाभ मिळू शकतील आणि त्याच्या पुनर्नियुक्तीसाठी विशिष्ट आदेशाची आवश्यकता नाही. आम्हाला असे आढळून आले आहे कि, दिनांक ०१/१०/२०१५ रोजी चा बडतर्फीचा आदेश १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३(१)(ब) च्या तरतुदीचे उल्लंघन करून जारी करण्यात आल्यामुळे सदर आदेश अवैध आणि रद्दबातल ठरवण्यात आला आहे. दिनांक १०/१२/२०१४ रोजी सुरु केलेली समेट प्रक्रिया बडतर्फचा आदेश दिनांक ०१/१०/२०१५ रोजी पारित केला तेव्हा प्रलंबित होती. समेट प्रक्रिया प्रलंबित असूनही बँकेने समेट अधिकाऱ्याची मंजुरी घेतली नाही. दिनांक २३/११/२०१७ रोजी समुचित सरकारला 'निष्फळ अहवाल' प्राप्त झाला या वस्तुस्थीवरूनच १९४७ च्या कायद्याच्या कलम २०(२)(ब) पार्श्वभूमीवरून असे स्पष्ट होते कि समेट प्रक्रिया त्या दिनांका पर्यंत प्रलंबित होती. परिणामी, याचिकाकर्त्याला बडतर्फीच्या रद्दबातलाच्या आदेशाच्या दिलास्यातून मिळणाऱ्या सवलतींचा हक्क असेल.

१० वरील कारणांमुळे, बँकेने दिनांक ०१/१०/२०१५ रोजी आदेश १९४७ च्या कायद्याच्या कलम ३३ (१) (ब) च्या तरतुदीचे उल्लंघन करून जारी करण्यात आल्यामुळे सदर आदेश रद्दबातल ठरवण्यात येतो. परिणामत: असे मान्य करण्यात येते कि बँकेने बडतर्फीचा कोणताही आदेश जारी केला नाही, त्यामुळे याचिकाकर्ता पूर्वीप्रमाणेच कार्यरत राहिल. वरील घोषणेप्रमाणे याचिकाकर्त्याला मिळणाऱ्या सर्व

लाभांचा हक्क आहे.

11. त्याप्रमाणे, रिट याचिका मंजूर केली जाते. अधिनिर्णय खर्चासह पूर्ण केला जातो.

**(वृषाली व्ही. जोशी, न्यायमूर्ति.)** **(ए. एस. चांदुरकर न्यायमूर्ति.)**

<u>**अस्वीकरण**</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल."